# प्रेसनोट

दिनांक –२४/१२/२०२४

आरटीओ पनवेल येथील लिपीक व खाजगी इसम यांना लाच स्विकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो ठाणे विभागाने घेतले ताब्यात.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे |
|---|---|
| स्टे.डा. नोंद क्रमांक | कळंबोली पो.स्टे. स्टे.डा.नोंद क्र.३८/२०२४ दि.२३.१२.२०२४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (संशोधन २०१८) सन १९८८ कलम ७, ७ अ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) संदीप संभाजी बासरे वय ४५ वर्षे कनिष्ठ लिपीक आर.टी.ओ कार्यालय पनवेल<br>२) खाजगी इसम कल्पेश अनंत कडू वय ३१ वर्षे रा.धोंडपाडा पो.कोपर्ली ता. पेण जि.रायगड<br>३) खाजगी इसम कपिल वामन पाटील वय ४५ वर्षे रा.साबर सोसायटी एमपी रोड पेण जि.रायगड |
| मागितलेली लाचेची रक्कम | ३२,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | तडजोडी अंती १३०००/–रु. |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांना मेरीडाईन ट्रान्सपोर्ट कंपनीचे वाहनाचे आरटीओचे काम करण्याचे अधिकार मिळाले होते त्याप्रमाणे सदर कंपनीचे ३२ ट्रेलरचे स्पिड गव्हर्नर सर्टिफिकेट ऑनलाईन अपडेट करण्याकरीता प्रत्येक वाहनाचे १००० या प्रमाणे ३२०००रु. लाचेची मागणी करीत असले बाबत तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २३/१२/२०२४ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान वरील नमुद आरोपी क्रमांक १ यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम १५०००/–रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १३,०००/– रू. लाच स्विकारण्याचे कबुल केल्याने लाप्रवि ठाणे युनिट यांनी सापळयाचे आयोजन करुन आरोपीतांना तक्रारदार यांचेकडुन १३,०००/– रू. लाचेची रक्कम स्विकारताना आरटीओ पनवेल कार्यालयात रंगेहाथ पकडण्यात आले आहे. नमुदप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा

---

मार्गदर्शक :– श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
श्री.गजानन राठोड, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
श्री.संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

संपर्कपत्ता :– ला.प्र.वि.ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रार
अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोलफ्रीनं :– १०६४
दुरध्वनीक्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसअॅपक्र. :– ९९३०९९७७००

Santosh PL

( संतोष अंबिके )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे